SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR- 416 004 MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004, महाराष्ट्र
दूरध्वनी : (ईपीएबीएक्स) 2638000 परीक्षक नियुक्ती विभाग 2609102, 2609103,
PHONE : EPABX-2638000, APPOINTMENT SECTION 2609102, 2609103
Website : www.unishivaji.ac.in
E-mail:appointment.a@unishivaji.ac.in & appointment.b@unishivaji.ac.in

Estd.1962

NAAC "A ++" Accredited by NAAC (2021) with CGPA- 3.52

संदर्भ क्र.शिवाजी वि./परिक्षक नियुक्ती विभाग/नितीन/690

दिनांक : 22 NOV 2023

प्रति,
मा.प्राचार्य /संचालक/अधिविभाग प्रमुख,
सर्व संलग्नित महाविद्यालये/ मान्यता प्राप्त शिक्षण संस्था/सर्व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय : ऑक्टोंबर/नोव्हेंबर, २०२३ या हिवाळी सत्रातील परिक्षेसाठी विद्यापीठ नियुक्त अंतर्गत व बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक यांच्या परीक्षा केंद्रावरील उपस्थितीबाबत..

महोदय/ महोदया,

आपणास विदित आहेच की, ऑक्टोंबर/नोंव्हेंबर, २०२३ मधील विद्यापीठाच्या हिवाळी सत्रामधील परीक्षा दि. २० ऑक्टोंबर, २०२३ पासून सुरु झाल्या आहेत. सदर परीक्षकेच्या अनुषंगाने अंतर्गत व बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक यांची नियुक्ती विद्यापीठ संगणक प्रणालीव्दारे **(By Software)** करण्यात येत आहे. या अनुषंगाने उपरोक्त विषयांकित परीक्षेकरीता अंतर्गत व बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक यांचे नियुक्ती आदेश संबंधितांना संगणक प्रणालीव्दारे यापूर्वीच पाठविण्यात आले आहेत. आदेशासोबत पर्यवेक्षकांना कामकाजविषयक सूचनाही पाठविण्यात आल्या आहेत.

तथापि, उपरोक्त परीक्षा काटेकोरपणे पार पडण्यासाठी अंतर्गत व बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक यांनी दिलेल्या नियुक्ती कालावधीत, संबंधित परीक्षा केंद्रावर उपस्थित राहून सुव्यवस्थितपणे कर्तव्य बजावणे अत्यंत आवश्यक आहे. सदर कर्तव्याबाबत गंभीर नसलेल्या अथवा अनुपस्थित राहणाऱ्या अंतर्गत व विशेषत: बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षकांची माहिती संबंधित परीक्षा केंद्राच्या प्राचार्य/विभागप्रमुख यांचेव्दारे तातडीने अनुपस्थित दिनांकासह विद्यापीठास कळविण्यात यावी. जेणेकरुन संबंधितांवर विद्यापीठ नियमानुसार पुढील कारवाई करता येईल. तसेच प्राचार्य/परीक्षा प्रमुख यांनी आपल्या महाविद्यालयातील अंतर्गत अथवा बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक हे कांही कारणास्तव विद्यापीठ नियुक्त आदेशानुसार संबंधित कालावधीमध्ये परीक्षा कामाकाज करणेकरीता असमर्थ असलेस सदर माहिती व पर्यायी नियुक्तीबाबतची शिक्षकांची माहिती आपल्याशी संबंधित समन्वयक महाविद्यालयास कळविण्यात यावी. जेणेकरुन परीक्षा कामाकाजामध्ये कोणत्याही प्रकारची आडचण निर्माण होणार नाही. याची नोंद घ्यावी.

तसेच कांही महाविद्यालये/अधिविभाग ही अनुपस्थित बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षकांची माहिती तातडीने विद्यापीठाच्या निदर्शनास आणत नाहीत असे दिसून येते. ही बाब गंभीर असून सदर बाबत संबंधित महाविद्यालय/ अधिविभाग यांचेवर विद्यापीठ नियमानुसार कार्यवाही केली जाईल याचे नोंद घ्यावी

आपला विश्वासू

22/11

उपकुलसचिव
परीक्षक नियुक्ती विभाग